# $खपली $

माणसाला जगण्यासाठी जे जे करावे लागते
ते सर्व करता आले पाहिजे.
खाणे.
पिणे.
झोपणे.
जागणे.
ऊभे राहणे.
प्रसंगी, होता आले पाहिजे सिंहासनार्धारी.
नसता,
त्याला सांगाव्या लागू नयेत पाण्याच्या गोष्टी.
आपल्या स्वत्वाला तडजोडीची भीक मागावी, अशी होऊ नये परिस्थिती निर्माण, व्यवस्थेच्या पैश्या-अडक्याच्या आकृतीबंधात.
सुखाचे कुंचले माळरानावर पेरणाग्रांनी हट्टी असले पाहिजे.
ऊडवला पाहिजे अचूक उडणाऱ्या मस्तवाल पक्षाचा उजवा डोळा.
पण
माणसे वर्तमानाची गय का करतात ?
ह्या आदिम प्रश्नाचे उत्तर
कोण देणार आहे

**$ संजय डोंगरे $**